# कोविड-१९ शी लढा, आजच लसीकरण करून घ्या!



या ठिकाणी सीजेपी ने कोविड-१९ साठी करण्यात येणाऱ्या लसीकरणाबाबत वारंवार विचारण्यात येणाऱ्या काही प्रश्नांची (FAQs) उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे.

## आपण लसीकरण का करून घेतले पाहिजे?

कोरोनाव्हायरसच्या झालेल्या प्रसाराचे प्रमाण पाहता आपण सर्वजण या रोगाबाबत असुरक्षित आहोत. कोविड-१९ विरुद्ध लढण्यासाठी लस हा सर्वोत्तम मार्ग आहे.



## लस कशा प्रकारे कार्य करते?

कोणत्याही लसी आपल्या शरीरामध्ये एखाद्या रोगाविरुद्ध आपली रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी प्रतिपिंडे (अँटिबॉडीज) निर्माण करतात की जेणेकरून संसर्ग टाळण्याच्या शक्यतेत वाढ होते. बहुतांश लसी चार ते सहा आठवड्यांच्या फरकाने दोन डोसेसमध्ये देण्यात येतात.

## लसी प्रभावी आहेत का?

विविध लसींच्या गुणकारितेचा दर किंवा परिणामकारकतेचे प्रमाण भिन्न असते, मात्र लसीविना राहण्यापेक्षा लस घेण्याने संसर्ग टाळण्याची शक्यता अधिक असते.

## भारतामध्ये कोणकोणत्या लसी उपलब्ध आहेत?

**सध्या भारत सरकारने पुढील लसींना मान्यता दिली आहे:**

**कोवॅक्सिन** (भारत बायोटेक द्वारा निर्मित)

**कोविशील्ड** (औषध कंपनी ॲस्ट्राझेनिका व ऑक्सफर्ड विद्यापीठ यांच्या सहयोगाने सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया द्वारा निर्मित)

**स्पुटनिक व्ही** (रशियन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट फंड द्वारा निर्मित) या लसीलाही मंजूरी देण्यात आली आहे आणि तिची पहिली बॅच दि. १ मे २०२१ रोजी भारतात पोचली आहे.

*भारत सरकारने इतर लस उत्पादकांकडूनही त्यांच्या लसींचे डोस भारतात विकण्यासाठी आवश्यक परवानगीसाठीचे अर्ज मागवले आहेत.*

*राज्य सरकारे आणि कोर्पोरेट्स इतर लस उत्पादकांसोबतदेखील लसी आयात करण्याबाबत चर्चा करीत आहेत.*

## कोविड-१९ लसींचे दुष्परिणाम काय आहेत?

काही लोकांना लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर सुरूवातीचे काही दिवस तिचे दुष्परिणाम जाणवतात. विविध लोकांना वेगवेगळ्या प्रकारचे आणि भिन्न प्रमाणात दुष्परिणाम जाणवले आहेत. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो:

लस घेतलेल्या ठिकाणी सूज आणि यातना, थकवा, डोकेदुखी, स्नायुदुखी, थंडी वाजणे, ताप, अतिसार.

## रक्ताच्या गाठी निर्माण होण्याबाबत काय मत आहे?

काही विशिष्ठ लसी घेतलेल्या लोकांमध्ये रक्ताच्या गाठी निर्माण होण्याच्या दुष्परिणामांबाबत अनेक दाखले मिळालेले असले तरी जागतिक आरोग्य संघटनेनुसार (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन - डब्ल्यूएचओ) आणि युरोपियन मेडिसिन्स एजन्सीनुसार (ईएमए) लस घेतल्यामुळे रक्ताच्या गाठी निर्माण होणे, हा अतिशय दुर्मिळ दुष्परिणाम आहे.

तसेच दोन्ही संस्थांच्या मते, लसीकरणाच्या धोक्यांपेक्षा त्याच्यामुळे होणारे लाभ अधिक आहेत.




**तर मग तुम्ही कशाची वाट बघताय? www.cowin.gov.in या वेबसाईटवर नावनोंदणी करा आणि तुमची लसीकरणाची अपॉइंटमेंट आजच बुक करा!**